**चिली राष्ट्राध्यक्षांची भारत भेट (1-5 एप्रिल 2025)**

27 मार्च 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन चिलीचे महामहिम राष्ट्राध्यक्ष श्री. गॅब्रिएल बोरिक फाँट 1-5 एप्रिल 2025 दरम्यान भारताच्या औपचारिक भेटीवर असतील. त्यांच्यासमवेत असलेल्या उच्च-स्तरीय शिष्टमंडळात मंत्री, संसद सदस्य, वरिष्ठ अधिकारी, उद्योग संघटना सदस्य, माध्यम प्रतिनिधी आणि भारत-चिली सांस्कृतिक संबंधाशी निगडित गणमान्य चिलीवासियांचा अंतर्भाव असेल.

2. राष्ट्राध्यक्ष पदाच्या कार्यकाळातील राष्ट्राध्यक्ष बोरिक यांची पहिलीच भारत भेट असेल. 5 एप्रिल 2025 रोजी चिलीला रवाना होण्यापूर्वी आग्रा, मुंबई आणि बंगळुरु या ठिकाणी भेटी देतील. आपल्या भेटीदरम्यान, 1 एप्रिल 2025 रोजी राष्ट्राध्यक्ष बोरिक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत भारत-चिली द्विपक्षीय संबंधावर विस्तारपूर्वक चर्चा करतील. पंतप्रधानांच्या वतीने मान्यवर अतिथींच्या सन्मानार्थ विशेष भोजनाचे आयोजन केले जाईल. भेटीदरम्यान राष्ट्रपती बोरिक हे आदरणीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी देखील संवाद साधतील. राष्ट्रपतींच्या वतीने देखील विशेष भोजन समारंभाचे आयोजन केले जाईल.

3. चिली सोबत भारताचे संबंध पारंपारिकदृष्ट्या स्नेहवर्धक आणि मैत्रीपूर्ण राहिले आहेत. चिली हा लॅटिन अमेरिकन प्रदेशातील भारताचा महत्वपूर्ण साथीदार आहे. वर्ष 1947 मध्ये भारतीय स्वातंत्र्य दिन समारंभाला विशेष दूत पाठविणारा LAC प्रदेशातील चिली हा एकमेव देश होता. UNSC सुधारणा, हवामान बदल, नूतनीकरणीय ऊर्जा आणि दहशतवाद यासारख्या अनेक आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर उभय देशांच्या मतात एकवाक्यता दिसते. चिली हा LAC प्रदेशातील भारतासाठी महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे.

4. मुंबई आणि बंगळुरूमध्ये राष्ट्रपती बोरिक हे राजकीय नेतृत्व, व्यवसाय आणि उद्योग प्रतिनिधी, स्टार्ट-अप्स, संशोधक आणि तंत्रज्ञान धुरीणांची भेट घेतील.

5. राष्ट्रपती बोरिक यांच्या आगामी भारत भेटीमुळे नेत्यांना द्विपक्षीय संबंधांचा व्यापक आढावा घेण्याची तसेच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर चर्चा करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

नवी दिल्ली

27 मार्च 2025